ePaper

| वर्ष - 6 । अंक - 50 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 25 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शिवसेनेकडून संभाजीराजेंना राज्यसभेची उमेदवारी नाहीच; संजय पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब



## आतील पानांत


- जगद्गुरू संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज शिळा मंदिराला ऐतिहासिक वारसा
- रॅडिकलायझेशन अन् पिंपरी-चिंचवड; दापोडीत संशयीत ताब्यात !
- "कुठं फेडाल ही पापं?" ......




वाराणसीचे मंदिर जितके जुने आहे, तितकीच ज्ञानवापी मशीदही खूप जुनी आहे. गेल्या तीन-चारशे वर्षांत मशिदीचा विषय कोणीही काढला नाही. पण काहीही करून देशात हिंदू-मुस्लीम आणि ख्रिश्चन लोकांमधील बंधुभाव कायमच संपला पाहिजे, असं भाजपचं धोरण आहे. महागाई, बेरजगारी यांवरुन लक्ष हटविण्यासाठी भाजपचा प्रयत्न आहे.

**शरद पवार,** अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

"एका गोष्टीचा खेद वाटतो ज्यावेळी आमच्या छत्रपतींना सन्मान देण्याची वेळ येते त्या त्यावेळी शिवसेनेने त्यांचा अपमान किंवा अनादर केलाय. त्याचं काय कारण आहे हे मला माहिती नाही. छत्रपतींच्या घराण्याचा जेवढा अनादर आणि अपमान शिवसेनेने केला तेवढा कोणीच केलेला नाही. म्हणून आपण बघितलं असेल कधी विश्वविख्यात प्रवक्ते छत्रपतींच्या वंशजांच्या घराण्याचे पुरावे मागतात."

**आशिष शेलार,** भाजप नेते



# राष्ट्रवादी-मनसे ट्विटर ब्रिजभूषण वादाचे पिंपरी-चिंचवड 'कनेक्शन'!

## माजी नगरसेवक मयूर कलाटे नव्याने चर्चेत

। पिंपरी । महाईन्यूज ।
रोहित आठवले ।



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचा रद्द झालेला आयोध्या दौरा, भाजप खासदार पैलवान ब्रिजभूषण आणि शरद पवार यांचा मनसे नेत्यांनी आज ट्विट केलेला फोटो हा पिंपरी चिंचवड ची संबंधित आहे. मावळात तीन वर्षांपूर्वी झालेल्या एका कुस्ती कार्यक्रमाला कुस्तीगीर संघटनेचे प्रमुख म्हणून भाजप खासदार ब्रिजभूषण तर महाराष्ट्राचे प्रमुख म्हणून शरद पवार तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते. चिंचवड विधानसभा मतदार संघातील राजकीय आखाड्यात कायम चर्चेत असलेले माजी नगरसेवक मयूर कलाटे यांनी मावळ तालुक्यात वरील कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लोकसभा निवडणुकांपूर्वी हा कुस्ती आखाडा भरविण्यात आला होता. त्यानंतर कलाटे यांचे नाव मावळ लोकसभेच्या उमेदवारीसाठी चर्चेत आले होते. दरम्यान, प्रार्थनास्थळांवरील भोंगा आयोध्या दौरा या कारणांनी मनसेप्रमुख राज ठाकरे सध्या देशाच्या राजकारणातील चर्चेचा केंद्रबिंदू झाले आहेत. राज ठाकरे यांना विरोध म्हणून भाजपचे खासदार ब्रिजभूषण समोर आल्याने राज ठाकरे यांचा अयोध्या दौरा हा कोणत्याही राजकीय पक्षाला मदत करण्यासाठी नव्हता असे काहीजण आता बोलू लागले आहेत परंतु राज ठाकरे यांनी खासदार ब्रिजभूषण त्यांनी केलेला विरोध आणि त्यापूर्वीचा नियोजित दौरा हा सर्व एक ट्रॅप असल्याचा उल्लेख पुण्यातील सभेत केला. त्याचबरोबर खासदार ब्रिज भूषण यांना महाराष्ट्रातील काही बड्या नेत्यांनी अप्रत्यक्ष मदत केल्याचा आरोपही या सभेत करण्यात आला.

### कुस्तीच्या मैदानात राजकीय आखाडा...

➡ खासदार ब्रिजभूषण आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे सलोख्याचे संबंध असल्याने दौऱ्याच्या या सर्व विरोधाला कोण कारणीभूत आहे असा सवाल करीत मनसेकडून आज मावळ तालुक्यात झालेल्या कार्यक्रमाचे फोटो ट्विट करण्यात आले. कुस्ती-बैलगाडा आणि पिंपरी चिंचवड मावळ हे नाते तसे जुने आहे आहे कुस्तीच्या आखाड्यात राजकीय आखाडा बनवण्याचा प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून होत राहिला आहे. मयूर कलाटे यांचे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याशी थेट संबंध आहेत. राज्यातील बड्या नेत्यांच्या संपर्कात असल्यामुळे कलाटेंचा स्थानिक राजकारणात वरचष्मा राहिला आहे.

# मनसेकडून शरद पवारांचे फोटो व्हायरल केल्यानंतर राष्ट्रवादीचा पलटवार

## राष्ट्रवादीचे प्रवक्ते क्लाइड क्रास्टो यांनी दिले उत्तर

। पुणे । महाईन्यूज ।





मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यातल्या सभेत अयोध्या दौऱ्याच्या स्थगितीचं कारण सांगितले होते. आपल्या दौऱ्याला विरोध करण्यासाठी महाराष्ट्रातून रसद पुरवल्याचा आरोप त्यांनी केला. त्यानंतर मनसे नेते सचिन मोरे यांनी शरद पवार, बृजभूषण सिंह आणि सुप्रिया सुळे यांचे एका कार्यक्रातील फोटो शेअर करताना ट्विट करत "कुछ फोटो अच्छे भी होते है.. और सच्चे भी होते है." असे म्हणत अप्रत्यक्षपणे शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. या आरोपाला आता राष्ट्रवादीचे प्रवक्ते क्लाइड क्रास्टो यांनी उत्तर दिलं आहे. "कुछ लोग डरते है और उस डर को छुपा ने के लिए फोटो मे बहाना ढूँढते है..." घाबरून अयोध्या दौरा रद्द केला, स्वतःचा पळपुटेपणा लपवण्यासाठी राष्ट्रीय कुस्ती संघ आणि राज्य कुस्ती संघ अध्यक्षांचे कुस्ती स्पर्धेत टिपलेले फोटो ट्विट केले. "लेकिन ये पब्लिक है, ये सब जानती है." असं ट्विट करत त्यांनी मनसेला टोला लगावला आहे. दरम्यान, मनसेने शेअर केलेले हे फोटो २०१८ मधील मावळ येथील कुस्ती स्पर्धेतील आहेत. मावळमध्ये झालेल्या कुस्ती स्पर्धेतील खासदार सुप्रिया सुळे यांनी ते त्यांच्या फेसबुकवर शेअर केले होते. तेच फोटो मनसेने ट्विट केले आहेत.

### काय म्हणाले होते राज ठाकरे ?

➡ अयोध्या दौरा तूर्तास स्थगित केल्यानं अनेकांना वाईट वाटलं, काही जणांनी कुत्सितपणे प्रतिक्रियाही दिल्या, अयोध्या दौऱ्याच्या निमित्तानं एक सापळा रचला गेला, त्याला रसद महाराष्ट्रातून पुरवली गेली," असा गंभीर आरोप राज ठाकरे यांनी रविवारी झालेल्या सभेत केला. राज ठाकरे यांचा अयोद्धा दौरा स्थगित झाल्यानंतरची ही त्यांची पहिली सभा होती. या सभेत राज ठाकरे काय बोलणार याकडे सगळ्याचे लक्ष होत. या सभेत त्यांनी भाजप, खासदार संजय राऊत, राणा दांपत्य, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीकास्त्र सोडलं.

## शॉर्ट न्यूज »

### दारू पिताना झालेल्या वादातून एकाचा चाकुने गळा चिरून खून, दोघे अटकेत

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

दारू प्याल्यानंतर झालेल्या वादातून दोघांनी एकाचा गळा चिरून खून केल्याची घटना मंगळवारी (२४ मे) पुण्यातील जुन्या जिल्हा परिषदेच्या इमारतीसमोर घडली. या प्रकरणी दोघांना समर्थ पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी प्रभातकुमार कमलाकर म्हस्के (वय ३६, रा. सोलापूर) आणि निलेश बाळासाहेब भोसले (वय २५ रा, वेल्हे) यांना अटक करण्यात आली आहे. संजय (वय ३५) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्याचे पूर्ण नाव आणि पत्ता पोलिसांना समजू शकला नाही. म्हस्के, भोसले, संजय मजुरी करतात. तिघे फिरस्ते असून त्यांना दारू पिण्याचे व्यसन आहे. म्हस्केला एका केटरिंग व्यावसायिकाकडे काम मिळाले होते. त्याला कामाचे सोळाशे रुपये मिळाले होते. त्यानंतर म्हस्के, भोसले, संजय यांनी रात्री एकत्र दारू प्याली. त्यानंतर म्हस्के आणि संजय यांच्यात वाद झाला. म्हस्के आणि भोसले यांनी संजयचा गळा चाकुने चिरला आणि दोघे जण पसार झाले. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच तातडीने तपास सुरू करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे,

### प्राचिन काळापासून असलेले हे मंदिर अधिकृत जागेत

# जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज शिळा मंदिराला ऐतिहासिक वारसा!

## श्री तुकाराम महाराजांचे वंशज महेश मोरे यांचा निर्वाळा

। देहू । महाईन्यूज । प्रतिनिधी

देहू येथील जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज प्राचीन शिळा मंदिर हे इतिहासकालीन आहे. या मंदिराच्या जीर्णोध्दाराचे भूमिपूजन २००८ साली राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले. सदर मंदिर हे पूर्णतः रेड झोन हद्दी बाहेर आहे. १४ जून रोजी त्याचे लोकार्पण



देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे. या शिळा मंदिराला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. तसेच हे मंदिर पूर्णतः अधिकृत जागेवर वसलेले आहे. असा खुलासा करत श्री तुकाराम महाराजांचे वंशज महेश मोरे यांनी माहिती दिली.

यावेळी मोरे म्हणाले की, सचिन काळभोर यांनी प्रसिद्धीस दिलेले निवेदन हे एक बालिश बुध्दीचे आणि माथेफिरूवृत्ती असून, त्यांचा याबाबत कोणताही अभ्यास नाही. मंदिर हे अधिकृत जागेतच आहे.

### काय म्हणाले होते सचिन काळभोर

दरम्यान, शिळा मंदिराचे बांधकाम संरक्षण विभागाच्या रेड झोन या प्रतिबंधित क्षेत्रात येत असल्याने ते नियमानुसार अनधिकृत बांधकाम आहे. त्यामुळे त्या उद्घाटनास भाजप युवा मोर्चाचे शहर उपाध्यक्ष सचिन काळभोर यांनी विरोध दर्शविला होता. अनधिकृत बांधकामाचे लोकार्पण पंतप्रधान मोदी यांनी करू नये, अशी मागणी काळभोर यांनी केली होती. त्यांनी मंदिराचे लोकार्पण केल्यास रेड झोनमधील हजारो अनधिकृत बांधकामांना एक प्रकारे प्रोत्साहन दिल्याचा चुकीचा संदेश नागरिकांमध्ये जाईल, असेही प्रसिद्धीस दिलेल्या वृत्तात म्हटले होते. मात्र काळभोर यांचा हा दावा खोडत श्री तुकाराम महाराजांचे वंशज महेश मोरे यांनी काळभोर यांना बालीश बुद्धी ही उपमा देऊन खडे बोल सुनावले आहेत.



“जगद्रू संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज शिळा मंदिर हे प्राचीन काळापासून इतिहास कालीन आहे. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या देह येथील शिळा मंदिराचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १४ जूनला होणार आहे. हे शिळा मंदिर अधिकृत जागेत असून, त्याचे लोकार्पण होत असताना पंतप्रधान कार्यालयाला त्या सबंधित सर्व कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. विशेष बाब म्हणजे पंतप्रधान कार्यालयाकडून सदरच्या कार्यक्रमाची खातरजमा केली जाते. त्यानंतरच अश्या कार्यक्रमांना येण्याचे पंतप्रधान कार्यालय मान्य करते.

**-महेश मोरे,** संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांचे वंशज

# पुण्यात लक्ष्मीबाई दगडूशेठ दत्तमंदिर ट्रस्टचा शतकोत्तर रौप्यमहोत्सव

## राष्ट्रपतींच्या हस्ते होणार पुरस्कार प्रदान

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी १२५ व्या वर्षाचा शुभारंभ सोहळा शुक्रवारी (२७ मे) दुपारी १२ वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. पुणे शहराच्या बुधवार पेठेतील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी १२५ व्या वर्षाचा शुभारंभ सोहळा शुक्रवारी (२७ मे) दुपारी १२ वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील उपस्थित राहणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रताप परदेशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी अ‍ॅड. शिवराज कदम जहागिरदार म्हणाले, “यंदाच्या लक्ष्मीबाई स्मृती पुरस्कार २०२२ चे वितरण राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते होणार आहे. शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष शुभारंभ सोहळ्याला



महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.”

“यावेळी उद्यानकृषी क्रांतीच्या जनक आणि डॉ.डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठ पिंपरीच्या प्र-कुलगुरु डॉ. भाग्यश्री पाटील, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर आणि आंतरराष्ट्रीय बोन्साय तज्ञ डॉ. प्राजक्ता काळे यांना यंदाचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दत्तमंदिराच्या १२५ वर्षांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या लक्ष्मीदत्त या कॉफीटेबल पुस्तकाचे प्रकाशन माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते होणार आहे,” अशीही माहिती कदम जहागिरदार यांनी दिली.

▶▶ या पत्रकार परिषदेला ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त अ‍ॅड. शिवराज कदम जहागिरदार, खजिनदार महेंद्र पिसाळ, उत्सवप्रमुख अ‍ॅड. रजनी उकरंडे, उप उत्सवप्रमुख युवराज गाडवे, ज्येष्ठ विश्वस्त सुनिल रुकारी, डॉ. पराग काळकर, अक्षय हलवाई आदी उपस्थित होते.

# धर्माबरोबर शिक्षणाचा प्रचार करणे आवश्यक !

## डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे प्रतिपादन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।




धर्माबरोबर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार गरजेचा आहे. शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. आज देशात धर्मावरून राजकारण सुरु आहे हे कुठेतरी थांबायला हवे. यापेक्षा हि महत्वाचे म्हणजे समाजाचा कसा विकास होईल याकडे आपण सर्वांनी लक्ष देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले. एरंडवणे येथील कलमाडी हायस्कूल येथे जंगमवाडीमठ श्री जगद्गुरु विश्वाराध्य विदयार्थी निलय, पुणे आणि डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामिजी यांच्या अमृतमोत्सवानिमित्त आजी - माजी निलय विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते अध्यक्षस्थानी बोलत होते.

यावेळी डॉ. चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य, प्रथम कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापिठाचे डॉ. इरेश स्वामी, डेप्युटी कमिशनर ऑफ पोलिस नागपूरचे गजानन राजमाने, द विश्वेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन अनिल गाडवे, ज्येष्ठ संचालक सुनील रुकारी, रेणूक शिवाचार्य महाराज, प्रबंधक काशी जंगमवाडी मठाचे नलिनी चिरमे, सचिन चिरमे, जंगमवाडी मठाचे व्यवस्थापक सुधाकर हलगणे, भरत उंबरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आजी आणि माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचलन श्रेयस उंबरकर यांनी केले आणि आकाश स्वामी यांनी आभार व्यक्त केले.

प्रख्यात गणित तज्ञ प्रा. डॉ. बसवराज मुडगी म्हणाले, सर्वांच्या आयुष्यात गुरू असणे आवश्यक आहे कारण गुरुमुळे आपल्या जीवनाला योग्य दिशा मिळते तसेच समाजात चांगला व्यक्ती म्हणून काम करता येते. आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी

“दान हा खूप मोठा गुण आहे व्यक्तिलाही मोठा बनवतो. आपण विविध दान पाहिले आहेत यात अन्न दान, विद्या दान, आर्थिक दान, कन्या दान आहेत परंतु विद्या दान हे आजीवन आनंद देत राहतो. आपण काम करत असताना सामाजिक भान ठेवणे आवश्यक आहे कारण आपण समृध्द झालो आहोत तर इतरांचाही विचार आपण करायला हवा तर देश प्रगतीपथावर जाईल.

- डॉ. चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य

# रॅडिकलायझेशन अन् पिंपरी-चिंचवड; दापोडीत संशयीत ताब्यात !

## 'एटीएस'ची कारवाई : तपास यंत्रणांच्या कारवाईला वेग




।पिंपरी । महाईन्यूज ।
रोहित आठवले ।

शहर आयुक्तालयात महिन्याभरापूर्वी झालेल्या सिक्युरिटी रिव्ह्यू मीटिंगमध्ये पिंपरी-चिंचवड परिसरात रॅडिकलायझेशन वाढत असल्याचे निरीक्षण नोंदविले गेले होते. त्यानंतर एटीएसने अवघ्या काही दिवसात दापोडीत कारवाई करून संशयिताला अटक केली आहे. एटीएस आणि दिल्ली स्पेशल सेलने दहशतवाद आणि नक्षलवादाशी संबंधाच्या संशयावरून किंवा थेट सहभाग उघड झाल्याने काही जणांना यापूर्वी पिंपरी-चिंचवड मधून अटक केली आहे. स्वतंत्र पोलिस आयुक्तालय झाल्यानंतर पण आयुक्तालयात चार वर्षानंतरही "एटीसी"चे काम सुरू झालेले नाही तर पुण्यातील "पीएटीसी"चे काम थंडावले आहे. पूर्वी गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी बोलाविले आहे असे म्हणले तरी अनेकांना भीती असायची.. पण सध्या गुन्हेशाखेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना घर ते ऑफिस असा स्वतःचा प्रवास करण्यासाठी गुगल मॅप ची गरज भासत आहे.

मात्र, सिक्युरिटी रिव्ह्यू मीटिंगमध्ये पिंपरी-चिंचवड परिसरात रॅडिकलायझेशन वाढत असल्याचे निरीक्षण नोंदविले गेल्यानंतर स्थानिक पोलिस आणि वरिष्ठ अधिकारी या बाबत गंभीर असून, आवश्यक कार्यवाही त्यांनी महिन्यापूर्वीच हाती घेतली होती. राज्य आणि केंद्र सरकारला याबाबत याबाबत कळविण्यात आले होते. त्यामुळे शहरात तपास यंत्रणांची अन्य कारवाईही येत्या काळात दिसून येऊ शकते.

दहशतवादी कारवाया आणि पुणे जिल्हा असा विचार करताना एटीएसच्या (राज्य दहशतवाद विरोधी पथक) धर्तीवर पुण्यात स्पेशल ऑपरेशन विंग सुरू झाले होते. कालांतराने राज्यभर हे विंग स्थानिक पोलिसांच्या अखत्यारीत सुरू करण्यासाठी पूनर्रचना करताना त्याचे नामांतर एटीसी (दहशतवाद विरोधी सेल) तर पुण्यात पीएटीसी असे झाले. या नामांतरानंतर राज्यात सर्वत्र एटीसी गुन्हेशाखेच्या अंतर्गत काम करत आहे. पुण्यात 4 वर्षांपूर्वी आलेल्या अती उच्चपस्थ अधिकाऱ्यांनी गुन्हेशाखेच्या अंतर्गत असलेले पीएटीसी हे "स्पेशल ब्रांच"ला जोडले, त्याचे काम थंडावले असे अनेक अधिकारी सांगतात.

### ... तर शहर शांत राहील

पिंपरी चिंचवड चे सध्याचे पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अनेक कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. विशेष शाखेतील कर्मचाऱ्यांना ही बदलण्यात आले आहे. त्यामुळे #मरगळलेल्या गुन्हे शाखेला आयुक्त आगामी काळात बळकटी देतील अशी आशा आहे. त्याचबरोबर शहराची जाण असलेल्या कर्मचारी अधिकाऱ्यांना मुख्य प्रवाहात आणून शहर शांत राहील असे नियोजन येत्या काळात पाहायला मिळू शकते\

### रिक्त जागेवर अधिकाऱ्यांची नियुक्ती व्हावी...


जंगली महाराज रस्त्यावरील साखळी बॉम्ब स्फोट, हैदराबाद बॉम्ब स्फोट, गुजरात बॉम्ब स्फोट, मुंबई साखळी स्फोटातील आरोपींचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे पिंपरी-चिंचवडचा यापूर्वी उघड झालेला संबंध विसरून चालणार नाही. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पुणे "एटीएस"ला रिक्त जागेवर अधिकारी मिळाले आहेत. त्यामुळे एटीएसला मदत होईल या स्वरूपाने "एटीसी"ने काम करण्याची गरज आहे, अशी अपेक्षा अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

### नेटकॉलींगद्वारे दहशतवाद्यांच्या हँडलरशी संपर्कात

**पुण्यातून यापूर्वीही "टेरर फंडिंग" प्रकरणी एकाला अटक झाली होती. भारतातील दहशतवादी कारवायांसाठी पाकिस्तानमधून येणारा पैसा (टेरर फंडिंग) भारताच्या वेगवेगळ्या भागात पोचविणाऱ्या उत्तर प्रदेशातील टोळीप्रमुख रमेश शहा (वय 28, रा.गोपालगंज, बिहार) यास महाराष्ट्र व उत्तर प्रदेश "एटीएस'ने फेब्रुवारी २०१९ मध्ये पुण्यातून अटक केली होती. पोलिसांच्या भीतीने त्याने उत्तर प्रदेशमधून पलायन करून पुण्यात वास्तव्य केले होते. तो नेटकॉलींगद्वारे दहशतवाद्यांच्या हँडलरशी संपर्कात होता. त्यांच्याकडून मिळणारे पैसे तो देशातील विविध राज्यात दहशतवादी कृत्य घडवून आणण्यासाठी पोचवीत होता.**

### शॉर्ट न्यूज »

#### सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढल्या प्रकरणी एकास अटक



।पिंपरी-चिंचवड।
महाईन्यूज ।प्रतिनिधी ।

सार्वजनिक ठिकाणी गांजा (ANTI-DRUG SQUAD) ओढल्या प्रकरणी अंमली पदार्थ विरोधी पथकाने एकास अटक केली. ही कारवाई सोमवारी (दि. 23 मे) दुपारी बारा वाजता स्पाईन रोड मोशी प्राधिकरण येथे करण्यात आली. गणेश बाळू थोरवे (वय 32, रा. आंबेवाडी, उर्से ता. मावळ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस नाईक दादा धस यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्पाईन रोड मोशी (ANTI-DRUG SQUAD) येथील सरदार चौकात आरोपीने गांजा आणि गांजा ओढण्याचे साहित्य बाळगून गांजा ओढला. याबाबत अंमली पदार्थ विरोधी पथकाला माहिती मिळाली असता पोलिसांनी कारवाई करत गणेश थोरवे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून 50 रुपयांचा गांजा आणि 20 रुपयांचे साहित्य जप्त केले. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

# भाजपा भोसरी विधानसभा मध्यवर्ती कार्यालयाचे लवकरच लोकार्पण

## माजी नगरसेवक, पदाधिकारी यांची राहणार उपस्थिती

पिंपरी । महाईन्यूज

भारतीय जनता पार्टीच्या भोसरी विधानसभा मतदार संघातील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण येत्या ३१ मे रोजी होणार आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा कार्यक्रम होईल, अशी माहिती माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांनी दिली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाने जोरदार मोर्चेबांधणी केली. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' असे ब्रिद हाती घेवून भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक काम करीत आहेत. भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कार्यालय सुरू करण्यात आले असून, चिखली- निगडी मंडल आणि चऱ्होली- भोसरी मंडलातील पदाधिकाऱ्यांनी याकामी पुढाकार घेतला आहे.




या कार्यक्रमाला माजी खासदार अमर साबळे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

### नागरिकांसाठी हक्काचे व्यासपीठ...

भाजपा शहर उपाध्यक्ष किसन बावकर म्हणाले की, नागरिकांना आपल्या समस्या थेट पक्ष कार्यालयात मांडता याव्यात. याकरिता चिखली-आकुर्डी रो, संतकृपा नगर, चिखली येथे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय तयार केले आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील नागरिकांसाठी हे कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी हे कार्यालय हक्काचे व्यासपीठ ठरेल, असा विश्वासही बावकर यांनी व्यक्त केला.

## संपादकीय »

# दिव्य वाहतूक कोंडी, अपघातांना निमंत्रण !

*केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची वेगवान कामाबद्दल ख्याती असूनही, मुंबई-गोवा महामार्गाविषयी असा कामाचा झपाटा लोकांना अनुभवण्यास मिळाला नाही. जिथे रस्ता सुधारला, तिथेही सूचनाफलक व इतर सोयीसुविधांची वानवा आहे.*

रस्त्यांच्या दुर्दशेबद्दल काय आणि कुणाकुणाला बोलावे? मुंबई-गोवा महामार्गाविषयी न्यायालयानेही कित्येकदा ताशेरे ओढले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची वेगवान कामाबद्दल ख्याती असूनही, मुंबई-गोवा महामार्गाविषयी असा कामाचा झपाटा लोकांना अनुभवण्यास मिळाला नाही. जिथे रस्ता सुधारला, तिथेही सूचनाफलक व इतर सोयीसुविधांची वानवा आहे. रस्तेवाहतुकीच्या निकषांचे अत्युच्च अस्तित्व म्हणजे आपल्याकडे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे मानला जातो. येथेही रस्त्यांची कामे सुरू असताना काय घडते, ते गेल्याच आठवड्यात झालेल्या भीषण अपघाताने दाखवून दिले.

आपल्याकडे कुणी नेते, पक्षप्रमुख यांना वाईट रस्ते, वाहतूक कोंडी यांचा जाच झाला, की चांगल्या दर्जाच्या रस्तेउभारणीचा नारळ फुटतो, याचे उदाहरण म्हणजे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-नाशिक महामार्ग. बाकी जनता रस्त्यांच्या नावाने ओरड करते, तेव्हा त्याची दखल कुणी घेत नाही. पूर्वी 'गतिरोधक पुढे आहे' हे सूचनाफलक शब्दांच्या चुकीच्या क्रमवारीमुळे विनोदाचा विषय ठरत; परंतु किमान ते फलक तरी असायचे. आता हे फलक शोधावे लागतात आणि गतिरोधक तर नानाविध प्रकारचे असतात. ते गती रोखण्यासाठी आहेत, की प्रवाशांचा कपाळमोक्ष व वाहनाच्या इंधनटाकीची गळाभेट व्हावी यासाठी आहेत, असा प्रश्न पडावा. रस्त्यावर दिवाबत्तीचीही वानवाच असते. कोट्यवधींची कंत्राटे निघतात, तरी रस्त्यांना खड्ड्यांची ठिगळेच. इतर राज्यांतील प्रवासी महाराष्ट्रातील रस्त्यांच्या दुरवस्थेची कीव करतात. कोट्यावधी रुपयांच्या कंत्राटात पैसे कोणत्या मार्गांवर झिरपतात, ते कोण शोधणार? वाहनचालकांची बेशिस्त व वरील समस्यांचा गुणाकार झाल्यास मिळणारे उत्तर प्राणावर बेतणारे असते. ज्या भागात वाहनांना कूर्मगतीनेच जावे लागते, अशा ठिकाणीही अपघातांची संख्या मोठी असते. 'अतिघाई संकटात नेई' हे वचन फलकापुरते नसून, वाहनचालकांच्या गळी उतरवण्याची वेळ आली आहे. आपल्याकडील वाहनचालक तयार करणारे कारखाने हे अवघ्या २० दिवसांत दररोज केवळ २० मिनिटांची शिकवणी देऊन, शिकाऊ वाहनचालकाला परवान्यासाठी तयार करतात.



## आनंदी सकाळ

# विचारांची सकारात्मकता

नकारात्मक स्वभावामुळे व्यक्ती प्रत्येक गोष्टीत चांगले कमी आणि दोष जादा शोधायला सुरुवात करते. घरी एखादा पाहुणा आल्यास तो काही तरी मागायलाच आला आहे, असे समजून त्याच्याशी अनेकदा फटकून व्यवहार केला जातो. पाहुणचारातही हात आखडता घेतला जातो. याचा परिणाम चांगला कसा होणार? माणसे तुटणारच ना! अनेकदा समोरचा माणूस चांगला वागत असतो; पण आपण ते समजून न घेता, त्याच्याशी दुराचार करतो.

एकदा रेल्वेतून प्रवास करताना एका साधूने बसायला जागा नाही, म्हणून सीटवर पिशवी ठेवलेल्या महिलेस, 'ताई, ती पिशवी खाली ठेवा,' अशी विनंती केली. ताई म्हटल्यानंतर ती भडकली. यामुळे संन्याशाने, 'माताजी पिशवी खाली ठेवा,' असे म्हटले. त्यावर ती आणखी भडकली. समोरचा माणूस कितीही चांगला बोलत असेल, वागत असेल आणि आपली दृष्टीच नकारात्मक असेल, तर जगातला चांगुलपणा कसा दिसणार?

# वाचक प्रवाहाचे संकेत माध्यमविश्वाला नवी ऊर्जा देणारे ठरावे






नवमाध्यमांच्या झगमगाटात, जाहिरातीसाठी वृत्तपत्रांना आणि पारंपरिक श्राव्य व दृकश्राव्य माध्यमांना वाचक, प्रेक्षक जास्त पसंती देत आहेत, असे या संशोधनातून पुढे आले. वृत्तपत्रातील जाहिराती सर्वांत विश्वासार्ह असतात आणि डिजिटल विश्वातील जाहिराती प्रेक्षकांना आवडत नाहीत, असा ठोस निष्कर्ष हा अहवाल मांडतो. ८२ टक्के वाचकांचा वृत्तपत्राकडे कल असल्याचे यात नमूद आहे. नवमाध्यमांचा एवढा बोलबाला असताना, छापील मजकूर जवळचा वाटतो, हे या संशोधनाचे सार आहे. जाहिरातीसाठी डिजिटल माध्यम निवडणारे जाहिरातदार पुन्हा वृत्तपत्राकडे वळू लागले आहेत आणि हे प्रमाण मागील वर्षापेक्षा ११ टक्क्यांनी वाढेल, असे संकेत यात मिळतात. दृश्य माध्यमातील कार्यक्रमाच्या आधी दाखवल्या जाणाऱ्या जाहिराती टाळण्याकडे प्रेक्षकांचा कल असून, ५७ टक्के प्रेक्षक त्याचा अवलंब करतात. ४३ टक्के प्रेक्षक तर या जाहिरातींकडे ढुंकूनही पाहत नाहीत, असे अनुमान मांडणारा हा अहवाल बदलत्या वाचक-प्रेक्षक रुचीचे दर्शन घडवतो. अर्थात, असे असूनही टीव्ही माध्यमाला ८०, तर रेडिओ माध्यमाला ७० टक्के लोकांनी पसंती दिली आहे.

'थर्ड पार्टी कुकीज', म्हणजे वेबसाइटच्या मालकाशिवाय इतरांविषयी माहिती देणारा जाहिरातवजा मजकूर, यावर आता भविष्यात बंधने येतील, असे दिसते. याचे कारण, गुगलने २०२३पासून आपल्या 'क्रोम' या सर्च इंजिनवरून ते हटवण्याचे संकेत दिले आहेत. ॲपलही त्याच मार्गाचा अवलंब करणार आहे. याचा परिणाम म्हणून आता वस्तू आणि सेवा पुरवठादार कंपन्या जुन्याच जाहिरात माध्यमाकडे वळल्या आहेत. हे बदलाचे प्रमाण सुमारे २० टक्के आहे.

'इबिक्विटी' या माध्यम आशयाचा सल्ला देणाऱ्या संस्थेच्या सर्वेक्षणानुसार, वृत्तपत्रे, टीव्ही आणि रेडिओ हे नवमाध्यमांपेक्षा अधिक प्रभावीपणे वाचक; तसेच प्रेक्षकांना खिळवून ठेवतात. ही धारणा या नव्या संशोधनाने पक्की केली. दर्जेदार संशोधन जगासमोर ठेवणाऱ्या शंभर वर्षे जुन्या अशा हार्वर्ड बिझनेस गटाने समोर आणलेले बदलत्या प्रेक्षक; तसेच वाचक प्रवाहाचे हे संकेत पारंपरिक माध्यमविश्वाला नवी ऊर्जा देणारे ठरावे.

# आशेच्या हिंदोळ्यावर...

**मध्य प्रदेशला जो न्याय, तोच आम्हालाही लागू व्हावा, अशी राज्य सरकारची रास्त अपेक्षा असली, तरी तेथील समर्पित आयोगाने तब्बल नऊ महिने घेतलेली मेहनत महाराष्ट्राचा मागासवर्ग आयोग घेणार का आणि महाविकास आघाडी सरकारही त्याबाबत गांभीर्याने पाठपुरावा करणार का, हे कळीचे प्रश्न उपस्थित झाले आहेत**

इतर मागासवर्गाच्या (ओबीसी) आरक्षणासह मध्य प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने अखेर मान्यता दिल्याने, महाराष्ट्र सरकारच्याही आशा पल्लवित होणे स्वाभाविक आहे. मध्य प्रदेशला जो न्याय, तोच आम्हालाही लागू व्हावा, अशी राज्य सरकारची रास्त अपेक्षा असली, तरी तेथील समर्पित आयोगाने तब्बल नऊ महिने घेतलेली मेहनत महाराष्ट्राचा मागासवर्ग आयोग घेणार का आणि महाविकास आघाडी सरकारही त्याबाबत गांभीर्याने पाठपुरावा करणार का, हे कळीचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. असे होण्याचे कारण म्हणजे, तेथील आयोगाने गाव, तहसील आणि जिल्हा (ट्रिपल टेस्ट) अशा तीन पातळ्यांवर काम करून सादर केलेला अहवाल न्यायालयाने शेवटी ग्राह्य धरला. महाराष्ट्रात याबाबत सर्वच पातळ्यांवर ढिलाई झाली, हे



तेवढेच खरे. अगदी ती भाजप-शिवसेना युतीचे सरकार असल्यापासूनच. भले आता सत्तारूढ व विरोधक एकमेकांवर दोषारोप करीत असले, तरी शिवराजसिंह चौहान सरकारने जी तत्परता दाखविली, तशी आघाडी सरकारला दाखविता आली नाही. आरक्षणासाठी सरकार गंभीर होते; पण त्यासाठी जे काम करणे अपेक्षित होते, त्याऐवजी आरोप-प्रत्यारोप व इतर कज्जेदलालीत वेळ दवडण्यात आला. अपुऱ्या माहितीच्या आधारावरील त्रोटक अहवाल सादर केल्यावरून सर्वोच्च न्यायालयाने काही महिन्यांपूर्वीच कान टोचले होते. केंद्राने इम्पिरिकल डेटासाठी नकार देणे, राज्य मागासवर्गीय आयोगाच्या स्थापनेत दिरंगाई आणि नंतर त्यांना मूलभूत सोयी-सुविधाच न पुरविणे, आयोगाची इच्छा नसतानाही अपुरा अहवाल सादर करणे, सुनावण्यांबाबत गांभीर्य नसणे असले प्रकार घडल्याने खोळंबा झाला. वास्तविक मध्य प्रदेशच्या समर्पित आयोगाने सादर केलेल्या पहिल्या अहवालावर आक्षेप नोंदवत, त्यांचाही इम्पिरिकल डेटा न्यायालयाने फेटाळला होताच. त्यानंतर मात्र या आयोगाने ३७ जिल्ह्यांतील २२ हजार ग्रामपंचायतींसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांत फिरून नेटाने डेटा जमवला, असा दावा केला जातो; तरीही चार दिवसांत असा काय चमत्कार घडला, की आधी फेटाळलेला अहवाल नंतर स्वीकारला गेला.

## ।। अभंगवाणी ।।



आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं ।
नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥
फावला एकांत एकविध भाव । हरि
आम्हांसवें सर्व भोगी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# “कुठं फेडाल ही पापं?” अजित पवारांचे अधिकाऱ्यांना खडे बोल!

## अजित पवार यांनी अधिकाऱ्यांची काढली खरडपट्टी, म्हणाले, “तुम्ही नरकातच जाल!”

।सातारा ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी आणि सडेतोड बोलण्याच्या पद्धतीसाठी परिचित आहेत. त्यांच्या अशा बोलण्यामुळे अनेकदा ते वादात देखील सापडले आहेत. मात्र, अशा प्रकारे त्यांनी समोरच्याला तिथल्या तिथे सुनावल्याचे अनेक प्रसंग देखील चर्चेत येत असतात. काही दिवसांपूर्वीच बुलढाण्यातील ऐतिहासिक वास्तूचं जतन आणि संवर्धन करण्यावरून त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली असताना नुकतंच साताऱ्यातील शासकीय विश्रामगृहाच्या बांधकामावरून त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावलं आहे. शिवाय, नंतर थेट स्टेजवरूनच या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली आहे.



### “अधिकाऱ्यांना वाटत असेल, हा सारखा दमच देत असतो”

“कुठं फेडाल ही पापं? वर गेल्यानंतर तुम्हाला तर नरकातच जावं लागेल. लोकांनी पण म्हटलं पाहिजे की खरंच त्या सरकारच्या काळात हे काम एक नंबर झालं. नाहीतर आम्ही मुंबईला आमच्या घरी पोहोचेपर्यंत इथे काहीतरी तुटलेलं असायचं. काय त्याला करायचंय? मग त्याबद्दल कारवाई नको का करायला?

काही काही अधिकाऱ्यांना वाटत असतं की हा सारखाच दम देत असतो. चांगलं काम केल्यानंतर तुमचं कौतुकही करेन ना”, अशा शब्दांत अजित पवारांनी अधिकाऱ्यांना सुनावलं आहे.

### उद्घाटनाच्या वेळीच बांधकामावरून सुनावलं!

अजित पवार यांच्याहस्ते साताऱ्यातील शासकीय विश्रामगृहाचं उद्‌घाटन करण्यात आलं. यावेळी त्यांनी आत जाऊन पाहणी केली.

तेव्हा सगळ्याच खोल्यांमध्ये बसवण्यात आलेले डबल बेड, भारंभार बसवण्यात आलेले लाईटचे स्पॉट अशा अनेक गोष्टींवरून त्यांनी आश्चर्यवजा नाराजी व्यक्त केली. एवढंच नाही, तर अजित पवारांनी चक्क स्वच्छतागृहातील फ्लश व्यवस्थित चालतात की नाही, याची देखील स्वत: खातरजमा केली.

### “चेंबरीचा पार चेचाच करून टाकला”

मात्र, यानंतर सभेत बोलताना स्टेजवरूनच त्यांनी अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली. “शासकीय विश्रामगृहाचं उद्‌घाटन झालं. पण मला काही ते आवडलेलं नाही. नुतन शासकीय विश्रामगृह चेंबरी.. त्या चेंबरीचा पार चेचाच करून टाकला आहे”, असं अजित पवार म्हणाले.

### “अधिकाऱ्यांना सांगायचंय, की बाबांनो...”

यावेळी अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना सूचक शब्दांत इशारा दिला आहे. “मी आता त्या बांधकामाची चौकशी लावणार आहे. मला अधिकाऱ्यांना सांगायचंय की बाबांनो, तुम्हाला आम्ही दीड लाख कोटी रुपये पगार आणि निवृत्ती वेतन देतो. आमच्या सगळ्या महाराष्ट्रातल्या जनतेच्या टॅक्सचा तो पैसा असतो. ते करताना कामं तरी चांगली करत चला”, असं अजित पवार म्हणाले.

## शॉर्ट न्यूज »

### ओबीसी आरक्षण घालविणे हे महाविकास आघाडी सरकारचे पाप-देवेंद्र फडणवीस



।मुंबई ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

आम्ही जे वारंवार म्हणतो, की ओबीसी आरक्षण घालविणे हे महाविकास आघाडी सरकारचे पाप आहे. ओबीसी आरक्षण रद्द करणे हे राज्य सरकारमधील कुणाचे तरी षडयंत्र आहे. यांनी ओबीसी आरक्षणाची हत्या केली आहे, असं म्हणत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार हल्लाबोल केलाय. भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यसमिती बैठकीत माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे बोलत आहेत. ओबीसी आरक्षणावर आपण सातत्याने संघर्ष करीत आहोत. डिसेंबर 19 ते मार्च 22 या काळात केवळ वेळकाढू धोरण राज्य सरकारने राबविले. जी कार्यपद्धती मध्य प्रदेश सरकारला कळविली. पण मध्य प्रदेश जे करू शकले, ते महाराष्ट्राने केले नसल्याचा टोलाही देवेंद्र फडणवीसांनी लगावलाय.

## केंद्र सरकारडून घरकामगारांचे सर्वेक्षण, देशातील 742 जिल्ह्यांचा समावेश

# घरकामगारांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक

### नोंदणीअभावी अनेक महिला योजनांच्या लाभापासून वंचित

नागपूर ।महाईन्यूज ।

संपूर्ण देशात घरकामगार महिलांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक असून त्यांच्यासाठी राबवण्यात येणाऱ्या अनेक योजना ऑनलाईन नोंदणीसह इतर अटीमुळे त्यांच्यापर्यंत पोहचतच नाही. २०११ च्या जनगणनेनुसार, देशात घरकामगारांची संख्या ४७ लाख, ८१ हजार ३५५ आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक (९ लाख ९२ हजार ४०) घरकामगार आहेत. त्यानंतर तामिळनाडू (६ लाख ५,१९९) व नंतर पश्चिम बंगाल (५ लाख ४९ हजार ३३५), आंध्रप्रदेश (४ लाख ६६ हजार २०९) या राज्यांचा क्रम लागतो. केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाच्या कामगार शाखेने २२ नोव्हेंबर २०२१ रोजी घरकामगारांचे सर्वेक्षण हाती घेतले असून त्यात देशातील ७४२ जिल्ह्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात ही संख्या सर्वाधिक असूनही येथे कल्याणकारी योजनांचा लाभ कामगारांपर्यंत पोहोचत नसल्याचे या क्षेत्रातील संघटनांचे म्हणणे आहे. महाराष्ट्रात २००४ मध्ये घरगुती कामगार कल्याण मंडळ स्थापनेची घोषणा करण्यात आली होती, ती अद्याप पूर्ण झाली नाही. २०२१ मध्ये राज्य शासनाने संत जनाबाई घरकामगार योजनेची घोषणा केली. त्यासाठी आर्थिक तरतूदही केली.



### राज्यनिहाय आकडेवारी

| राज्य | संख्या |
|---|---|
| महाराष्ट्र | ९,४२,०४० |
| तामिळनाडू | ६,०५,१६९ |
| पं.बंगाल | ५,४९,३३५ |
| आंध्र प्रदेश | ४,६६,२०९ |
| कर्नाटक | ३,२०,५८५ |
| गुजरात | २,३९,५१७ |
| उत्तर प्रदेश | २,०१३१६ |

## “...तर आताच राजीनामा देतो”; कुलगुरूंसमोरच उदय सामंत यांचे वक्तव्य

।नागपूर ।महाईन्यूज । प्रतिनिधी।




काही कुलगुरू निवृत्त झाल्यावर आरोप करतात की उदय सामंत विद्यापीठामध्ये हस्तक्षेप करतात. मात्र, कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग हवा असेल, यांच्या स्वतःच्या वेतनाची किंवा कुलसचिवांची थकबाकी असेल तर मंत्र्याची मदत हवी. मात्र चांगल्या गोष्टीसाठी आम्ही सूचना दिल्या तर लगेच हस्तक्षेपाचा आरोप होतो, असं म्हणत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी उघडपणे कुलगुरुंसमोरच आपली नाराजी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठच्या (बाटू) नागपूर येशील उपकेंद्राच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

अभियांत्रिकी महाविद्यालये ‘बाटू’मध्ये समाविष्ट करण्याचा घाट ; महसुलासह अनेक बाबींवर परिणाम पुणे विद्यपीठात अनेक वर्षांपासून पडून असलेली छायाचित्रे लावायच्या सूचना केल्या किंवा रानडे इन्स्टिट्यूटची जागा वाचवण्यासाठी प्रयत्न केला असेल तर हा शिक्षण मंत्रीचा हस्तक्षेप ठरतो का? असा सवाल सामंत यांनी यावेळी केला. विद्यापीठाच्या अनेक प्राधिकरणामध्ये होणाऱ्या कुठल्या निर्णयात दखल दिली नाही.

## शॉर्ट न्यूज »

### दाऊद कराचीमध्येच, ईडीसमोर भाचा अलीशाह पारकरने केलं कबूल



। हरयाणा ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

नवी दिल्ली । भारताचा मोस्ट वॉन्टेड अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम कराचीमध्ये लपून बसल्याची चर्चा अनेक वर्षांपासून सुरु आहे. त्यावर आता शिक्कामोर्तब खुद्द दाऊदच्या भाच्यानेच केला आहे. त्यामुळे पाकिस्तानचा बुरखा फाटला आहे. दाऊदचा भाचा म्हणजेच हसीना पारकरचा मुलगा अलीशाह पारकर याने अंमलबजावणी संचालनालयकडे (ईडी) आपला मामा म्हणजेच कुख्यात गुंड दाऊद पाकिस्तानात कराचीमध्ये असल्याची कबुली दिली आहे. तसेच दाऊदचे कुटुंब सणासुदीच्या दिवशी आमच्या संपर्कात होता अशी देखील माहिती अलीशाहने दिल्याने खळबळ माजली आहे. अलीशाह पारकरने ईडीला सांगितले की, १९८६ ला दाऊदने भारत सोडला आणि फरार झाला.

### प्रभू श्री राम मंदिराचे बांधकाम 2024 पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य

# अयोध्या राम मंदिराच्या गर्भगृहाचे काम 1 जूनपासून सुरु होणार !

### श्री राम मंदिराच्या उभारणीला वेग, CM योगी राहणार उपस्थित

नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**अयोध्येतील श्री राम मंदिराच्या उभारणीला वेग आला आहे. 1 जूनपासून मंदिराच्या गर्भ गृहाच्या बांधकामाला सुरुवात होणार आहे. या गर्भगृहाच्या बांधकामाला मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते सुरुवात होणार आहे. योगी उपस्थित राहणार असून एक दगड ठेवतील यानंतर बांधकाम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान मंदिराचे बांधकाम 2024 पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑगस्ट 2020 मध्ये राम मंदिराचे बांधकाम करण्यासाठी उद्घाटन करण्यात आले होते. यानंतर आता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते गर्भगृहाच्या बांधकामासाठी पहिला दगड ठेवतील. श्री राम मंदिराचा चबुतरा उभारण्यासाठी एकूण 1 लाख 70 हजार ग्रेनाईट दगडांची गरज लागणार आहे. परंतु यामध्ये आतापर्यंत 5 हजार दगडांचा वापर करण्यात आला आहे.**



### बांधकामाची सर्व कामे एकाच वेळी प्रगतीपथावर

मंदिराच्या बांधकामाची सर्व कामे एकाच वेळी प्रगतीपथावर सुरु आहेत. गर्भगृहाभोवती प्लिंथचे बांधकाम, कोरीव गुलाबी वाळूचे दगड, पिंडवारामध्ये गुलाबी दगड, मकराना संगमरवरी कोरीव काम आणि दक्षिणेकडे आरसीसी रिटेनिंग भिंतचे बांधकाम सुरु आहे. गर्भगृहाचे व्यासपीठ सप्टेंबर महिन्यांपर्यंत तयार करायचे आहे. यासह मंदिराचे बांधकाम सुरुच राहणार आहे.

## कर्नाटकच्या हुबळीमध्ये भीषण रस्ते अपघात; 7 जणांचा मृत्यू, 27 जखमी



। हुबळी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

कर्नाटकच्या हुबळीमध्ये आज भीषण रस्ते अपघात घडला आहे. प्रवासी बस आणि लॉरी यांच्यात झालेल्या या अपघातात 7 जणांचा मृत्यू झाला आहे. तर 26 जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर KIMS रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सोमवारी रात्री हा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की यात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. पोलिसांनी घटनेची माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवासी बस कोल्हापूरहून बंगळुरूकडे जात होती. यावेळी कर्नाटकच्या हुबळी शहराच्या बाहेर रात्री 12:30 ते 1 वाजण्याच्या सुमारास या प्रवासी बस आणि लॉरी यांच्यात जोरदार धडक झाली. या धडकेत 7 जण ठार तर 26 जखमी झाले. धारवाडकडे जाणाऱ्या लॉरीला बसची धडक बसली तेव्हा बसचालक ट्रॅक्टरला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करत होता. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल होत एफआयआर नोंदवला आहे. या अपघातातील मृतांचे मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आले आहेत. सध्या पुढील तपास सुरू आहे.

### अपघाताचे प्रमाण वाढले

याआधीही कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यात आणखी एक रस्ता अपघात झाला होता, ज्यामध्ये ७ जणांचा मृत्यू झाला होता. भरधाव वेगात असलेल्या कारचा तोल सुटून झाडावर आदळल्याने हा अपघात झाला. लग्न आटोपून सर्व लोक गावी परतत होते. या अपघातात 10 जण जखमीही झाले आहे.

### राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेकडून दोन उमेदवारांची नावं आघाडीवर

# 15 राज्यांमधील राज्यसभेच्या 57 जागांसाठी 10 जून रोजी निवडणूक

### राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी 41 आमदारांच्या मतांची गरज

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

15 राज्यांमधील राज्यसभेच्या 57 जागांसाठी 10 जून रोजी निवडणूक होणार आहे. 31 मेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. महाराष्ट्रातूनही 6 सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे. विधानसभेतील आमदारांच्या संख्येनुसार भाजपला 2, शिवसेनेला 1, काँग्रेसला 1, राष्ट्रवादीला 1 अशा जागा मिळू शकतात. राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी 41 आमदारांच्या मतांची गरज असते.

विशेष म्हणजे महाविकास आघाडीकडे 27 मतं अतिरिक्त असली तरी भाजपकडे 22 मतं शिल्लक आहेत. त्यामुळे सर्वपक्षीय आमदारांच्या उरलेल्या संख्येनुसार जर संभाजीराजेंना पाठिंबा दिला तर संभाजीराजे निवडून येऊ शकतात.



### मी तीन टर्म म्हणजेच 15 वर्षे नगरसेवक होतो : संजय पवार

शिवसेनेत 1989 म्हणजे साधारण 30 वर्षे मी काम करत आहे. शिवसेनेत अनेक चढ-उतार मी पाहिलेत. मातोश्रीला आम्ही कायम मंदिर मानलंय. आमचे मोठे साहेब आणि उद्धव साहेब दैवत म्हणून आम्ही काम करतोय. तसेच काही तरी आपल्याला मिळावं म्हणून कधीच काम केलं नाही. मी तीन टर्म म्हणजेच 15 वर्षे नगरसेवक होतो. 14 वर्षे जिल्हाप्रमुख म्हणून काम पाहतोय. शहरप्रमुख म्हणून काम बघितलेलं आहे. तालुका प्रमुख म्हणून काम पाहिलंय. सर्वसामान्य कार्यकर्त्याला उच्च पदावर नेऊन ठेवणारा हा पक्ष आहे, असंही संजय पवारांनी म्हटलंय.

### तरी हा संजय पवार त्यांच्या पाया पडतोय

साहेबांच्या डोक्यात तसं काही असल्यास ते उमेदवारी देतीलही. नाही दिलं तर शिवसैनिक म्हणून काम करण्याची माझी तयारी आहे. संधी दिली तर लढायला तयारच आहोत. कायमच लढायला तयार होता. साहेबांचा आदेश हा आदेशच आहे. आपल्या पक्षात काही मागायचं नसतं, काम बघून, पक्ष बघून मातोश्री ठरवत असतं, काय द्यायचं की काय नाही द्यायचं. शिवसेनेत अशा पद्धतीने काम चालते. संभाजीराजे आमचे राजे आहेत, आदरणीय कुटुंब आहे, मी एवढा मोठा नाही. आम्हाला त्या घराबद्दल खूप आदर आहे. मोठे राजे असू देत, संभाजीराजे असू देत, मालोजीराजे असू देत किंवा त्यांचे छोटे चिरंजीव असले तरी हा संजय पवार त्यांच्या पाया पडतोय.

### शिवाजीराव आढळराव पाटील आणि उर्मिला मातोंडकर यांची नावे चर्चेत

माझं नाव आघाडीवर आहे, माझं नाव चर्चेत आहे हे कालपासून माध्यमातूनच मला समजलं आहे. शिवाजीराव आढळराव पाटील आणि उर्मिला मातोंडकर यांचीही नावे चर्चेत आहेत. त्याबाबतीत माझंही नाव चर्चेत असल्याचं आता माध्यमातून मी पाहिलंय. पण वरिष्ठांकडून मला तसा सिग्नल मिळालेला नाही. तसा फोनही मला आलेला नाही. चर्चेतूनच माझं नाव पुढे आलेलं आहे, असंही कोल्हापूरचे शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार यांनी सांगितलं आहे.

### शिवसेनेकडून संजय पवार आणि चंद्रकांत खैरेंच्या नावाची चर्चा

शिवसेनेनं संभाजीराजेंच्या उमेदवारीवर सस्पेन्स कायम ठेवला आहे. राज्यसभा निवडणुकीसाठी शिवसेनेकडून दोन उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितले जातेय. त्याचवेळी संजय राऊत यांना पक्षाकडून संभाजीराजेंना राज्यसभेच्या तिकिटाची ऑफर दिल्याच्या वृत्ताबाबत विचारले असता त्यांनी सावध प्रतिक्रिया दिलीय. आम्ही नक्कीच छत्रपती घराण्याचा मान राखून त्यांना उमेदवारीचा प्रस्ताव दिला, पण ते शिवसेनेचे उमेदवार असतील, दोन्ही उमेदवार शिवसेनेचे असतील, असं संजय राऊत म्हणालेत. विशेष म्हणजे शिवसेनेकडूनही कोल्हापूरचे शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार आणि माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या नावाची चर्चा आहे.


# अरे देवा! सामंथा रुथ, विजय देवरकोंडाच्या गाडीला अपघात



चैन्नई- दाक्षिणात्य सिनेमातील प्रसिद्ध अभिनेत्री सामंथा रुथ प्रभू आणि प्रसिद्ध अभिनेता विजय देवरकोंडा यांचा काश्मीरमध्ये सिनेमाचं चित्रीकरण करत असताना अपघात झाला. हे दोघंजण त्यांच्या आगामी 'कुशी' सिनेमातील एका साहसी दृश्याचं चित्रीकरण करत होते. या अपघातामध्ये दोघांच्या पाठीला दुखापत झाल्याची माहिती विजय च्या टीममधील एका व्यक्तीनं दिली.

विजय देवरकोंडा याच्या टीममधील एका व्यक्तीनं दिलेल्या माहितीनुसार 'सामंथा आणि विजय काश्मीरमधील पहलगाम इथं एक स्टंट सीनचा सीक्वेन्स चित्रीत करत होते. हा सीन खूपच धोकादायक होता. या सीनमध्ये लिद्दर नदीच्या दोन किनाऱ्यांवर दोरी बांधली होती. त्या दोरीवरून विजय आणि सामंथला गाडी चालवत न्यायची होती. हा सीन चित्रीत करताना दोघांसह गाडी पाण्यात पडली. त्यात विजय आणि सामंथाच्या पाठीला दुखापत झाली. दोघांवरही प्राथमिक उपचार केले होते. त्यानंतर त्यांना बरंही वाटलं होतं.' बरं वाटल्यानं सामंथा आणि विजयनं रविवारी पुन्हा चित्रीकरणाला सुरुवात केली. त्यानंतर श्रीनगर इथल्या डल तलावाच्या परिसरात त्यांनी काही सीन चित्रीत केले. सिनेमाच्या एका क्रू मेंबरनं सांगितलं की, 'हे चित्रीकरण सुरू असताना दोघांनीही पाठीत दुखत असल्याचं सांगितलं. त्यानंतर त्यांना तातडीनं हॉटेलमध्ये नेण्यात आलं. फिजोथेरेपिस्टला बोलावण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या सिनेमाचं चित्रीकरण सुरू असताना संपूर्ण परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. दोन्ही कलाकारांच्या जवळ कुणालाही जाऊ दिलं जात नाही.' चित्रीकरण पूर्ण झालं असून ते दोघंजण सोमवारी दुपारी काश्मीरमधून रवाना झाले आहेत.

# कॉलेजमध्ये असताना ट्रेननंही केलाय प्रवास-आदिनाथ कोठारे



आपण हिंदी चित्रपटसृष्टीतील स्टार्स, दिग्दर्शक यांच्या मुलांबद्दल नेहमीच पाहत असतो, वाचत असतो. आजकाल तर सोशल मीडिया प्रभावी झाल्यापासून कुठल्याही स्टारला मुल झालं, की मग त्याच्या पहिल्या टॅह्यापासून ते रांगू लागलं, चालू लागलं असे फोटो किंवा व्हिडिओ झळकत असतात. त्यांना स्टार किड म्हटलं जातं. फोटोग्राफर्स त्यांच्या मागेच असतात. पण मराठीत वेगळं चित्र दिसत आलंय आणि आजही दिसतंय.

भारतीय टुरिंग पार्टी म्हणजेच BHA2PA च्या इन्स्टाग्रामवर या संदर्भातच आदिनाथ कोठारेचा इंटरव्ह्यू घेतलाय. त्याला विचारलंय की महेश कोठारे हे मोठे निर्माता, दिग्दर्शक. मग त्यांचा मुलगा म्हणून मोठा होताना हे वेगळेपण जाणवलं का? तुला त्यांच्या सावलीत राहावं लागलं का? यावर आदिनाथ म्हणाला आहे, 'माझ्या घरात वातावरण खूप वेगळं आहे. मी जरी एका मोठ्या निर्माता, दिग्दर्शकाचा मुलगा असलो तरी मला तसं कधी जाणवू दिलं नाही. शाळेत असताना तर माझ्या ते लक्षातही यायचं नाही.' आदिनाथनं कॉलेजला जाताना अनेकदा ट्रेनही पकडली आहे. तो पुढे सांगतो, 'आमचा सगळा फोकस जरी एन्टरटेनमेंट असला, तरीही घरचं वातावरण नॉन फिल्मी होतं. त्यामुळे माझे वडील मोठे निर्माता, दिग्दर्शक आहेत याचा नात्यात काही फरक पडला नाही.' शिवाय आदिनाथ म्हणाला की तू यातच करियर करावंस, अशी कुणी माझ्यावर जबरदस्ती केली नाही. 'मला हवं ते करायची मुभा होती.

# नागराज मंजुळेंच्या 'झॉलीवूड'चा धमाकेदार ट्रेलर लाँच




झाडीपट्टी नाटकाची धमाल दाखवणाऱ्या झॉलीवूड चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियाद्वारे लाँच करण्यात आला. बऱ्याच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय महोत्सवात गौरवलेला, पुरस्कारप्राप्त 'झॉलीवूड' हा चित्रपट ३ जून रोजी प्रदर्शित होत असून, पहिल्यांदाच झाडीपट्टी नाटकाचं खरंखुरं चित्रण या चित्रपटातून मांडण्यात आलं आहे. नागराज मंजुळेसारख्या मान्यवर दिग्दर्शकाने चित्रपटाला शुभेच्छा दिल्या आहेत.

नागराज मंजुळे यांनी पोस्ट शेअर करत लिहिले की, "झॉलीवूड घेऊन येतोय.. अस्सल मातीतला सिनेमा... झाडीपट्टी हा विषय भारतीय सिनेमासाठी नवीन आहे... अतिशय कष्टातून आणि जिद्दीनं त्यांनी हा सिनेमा पूर्ण केला आहे, 3 जूनला झॉलीवूड सगळीकडे प्रदर्शित होत आहे.

# कंगना रणौतच्या करिअरची गाडी फारच स्लो, १६ वर्षात केले ३६ सिनेमे आणि दिले फक्त ५ हिट



बॉलिवूडमधील हुशार आणि चोखंदळ अभिनेत्रींच्या यादीत कंगना रणौतचे नाव घेतले जाते. सिनेमात काम करण्यासाठी घरातून पळून आलेल्या कंगनाने गेल्या १६ वर्षात भरपूर प्रसिद्धी कमावली. कायम काही ना काही वादग्रस्त विधानं करून चर्चेत येणारी कंगना अनेकदा ट्रोल होते खरी, पण तिच्या अभिनय क्षमतेबद्दल कुणाचंच दुमत नाही.

कंगनाचा नवा सिनेमा कोणता येणार याची एक वेगळीच उत्सुकता बॉलिवूडप्रेमींना असते. तिच्या सिनेमाचं ती असं काही हटके प्रमोशन करत असते की तिचा सिनेमा म्हणजे काहीतरी वेगळा असणार हे समीकरण असतंच. मग माशी नेमकी शिंकते कुठं? असा प्रश्न तिच्या चाहत्यांनाच नव्हे तर कंगनालाही पडत असेल. कंगनाच्या १६ वर्षांच्या फिल्मी करिअरमध्ये तिने ३६ सिनेमे केले पण त्यापैकी फक्त ५ सिनेमेच बॉक्स ऑफीसवर हिट ठरले.

पद्मश्री पुरस्कार आणि चार राष्ट्रीय पुरस्कार कंगनाच्या नावावर आहेत. पण कंगनाच्या सिनेमाला प्रेक्षकांची खचाखच गर्दी होत नाही. याचं कारण अजून कळालं नाही पण आहे हे असं आहे. कंगनाच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या धाकड सिनेमानेही तिला यश मिळवून दिलं नाही. पहिल्या दिवशी कशीबशी या सिनेमाने ५० लाखांची कमाई केली. वर्षभर वादग्रस्त बोलण्याने प्रसिद्धीच्या राहणारी कंगना तिच्या फिल्मी करिअरमध्ये मात्र खूपच स्लो आहे. 'धाकड'लाही तिच्या प्रसिद्धीचा काहीच उपयोग झाला नाही.

# नाद करा पण दीपिकाचा कुठं! गळ्यात घातलेल्या नेकलेसची चर्चा



'कान्स' फिल्म फेस्टिव्हल हा जसा विविध सिनेमांच्या प्रीमिअरने वैशिष्ट्यपूर्ण ठरतो, तसंच जगभरातल्या कलावंतांना इथल्या रेड कार्पेटचीही भुरळ पडते. बॉलिवूडमधल्या अभिनेत्रीही इथं जाण्यासाठी उत्सुक असतात. त्या आपल्या पेहरावात फॅशनच्या जागतिक ट्रेंड्चा विचार करतातच; शिवाय त्याला भारतीय पेहरावाचा 'टच'ही देतात. अभिनेत्री दीपिका पादुकोण यंदा कान्स महोत्सवात परीक्षक म्हणून चमकते आहे. यासाठीचे तिचे पेहराव आणि स्टायलिंग चर्चेत आहे. त्यावर टीका आणि कौतुक दोन्हीचा वर्षाव होत आहे. 'कान्स' महोत्सवाच्या रेड कार्पेटवर जाणाऱ्या कलाकारांची जगभरात चर्चा होते. यंदा या महोत्सवात दीपिका परीक्षक म्हणून चमकतेय. तिनं तिथले अनेक फोटो शेअर केले आहेत. दीपिका वेगवेगळ्या लुकमध्ये कान्सच्या रेडकार्पेटवर दिसली. जितकी चर्चा दीपिकाच्या लुकची झाली, त्याहून अधिक चर्चा तिचे कपडे आणि दागिन्यांच्या किंमतीची झाली. दीपिकाचा एक खास लुक सध्या चर्चेत आलाय. काळ्या रंगाच्या ब्लेजर ड्रेसमध्ये दीपिकाचा लुक चाहत्यांना आवडतोय. त्यासोबतच तिनं गळ्यात एक हटके आणि आकर्षक असा नेकलेस घातलाय. हा नेकलेस सध्या चर्चेत आलाय. कारण म्हणजे या नेकलेसची किंमत.

## शॉर्ट न्यूज »

### ‘गरज पडल्यास केव्हाही फोन कर’ - रोहित शर्मा



नवी दिल्ली । महाईन्यूज

नवी दिल्ली । इंडियन प्रिमियर लीगचा (आयपीएल) थरार सध्या अंतिम टप्प्यात आला आहे. गुणतालिकेतील अव्वल चार संघ आता अंतिम सामन्यात स्थान मिळवण्यासाठी एकमेकांसोबत दोन हात करताना दिसतील. पाचवेळा विजेता ठरलेल्या मुंबई इंडियन्ससाठी यंदाचा हंगाम सर्वात वाईट ठरला. आपल्या एकूण 14 साखळी सामन्यातील 10 सामने गमावल्यामुळं मुंबई इंडियन्स गुणतालिकेच्या सर्वात तळाला रहावे लागले आहे. स्पर्धेतील आव्हान पूर्णपणे संपुष्टात आल्याने मुंबईच्या खेळाडूंनी आता आपापल्या घरचा रस्ता धरला आहे. हळूहळू एक-एकजण बायोबबलमधून बाहेर पडत आहे. या दरम्यान, मुंबईचा कर्णधार रोहित शर्माची एक कृती जास्त चर्चेत आली आहे. रोहित शर्मानं बायोबबलमधून बाहेर पडणाऱ्या रमणदीप सिंगला निरोप देताना मदतीचं आश्वासन दिले आहे. त्याच्या या कृतीचे सध्या सोशल मीडियावर

# रोहित-विराटच्या कामगिरीची चिंता नाही!

## भारताच्या आजी-माजी कर्णधाराला सूर गवसण्याचा गांगुलीला विश्वास

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

**रोहित** शर्मा आणि विराट कोहली या भारतीय क्रिकेट संघाच्या आजी-माजी कर्णधारांना इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या यंदाच्या हंगामात



कोलकाता : रोहित शर्मा आणि विराट कोहली या भारतीय क्रिकेट संघाच्या आजी-माजी कर्णधारांना इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या यंदाच्या हंगामात धावांसाठी झगडावे लागले. मात्र, या दोघांच्या कामगिरीची चिंता नसून त्यांना लवकरच सूर गवसेल, असा विश्वास भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) अध्यक्ष सौरव गांगुलीने व्यक्त केला.

मुंबई इंडियन्स संघाचा कर्णधार रोहितला यंदा ‘आयपीएल’मध्ये १४ सामन्यांत केवळ २६८ धावा करता आल्या. तसेच त्याचा संघ गुणतालिकेत तळाला राहिला. “कर्णधार म्हणून रोहितने यापूर्वी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याच्या नेतृत्वाखालील संघांनी पाच वेळा ‘आयपीएल’, तर एकदा आशिया चषकाचे जेतेपद पटकावले आहे. त्यामुळे त्याच्या क्षमतेबाबत कोणालाही शंका नाही. खेळाडूही माणसेच आहेत आणि माणसाकडून कधी तरी चुका होणार हे अपेक्षितच असते,” असे गांगुली म्हणाला.

आगामी टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा, उमरान मलिक, दिनेश कार्तिकला संधी, विराटला विश्रांती तसेच गुजरात टायटन्सविरुद्ध अखेरच्या साखळी सामन्यातील अर्धशतकापूर्वी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विराटला १३ सामन्यांत केवळ २३६ धावा करता आल्या होत्या. त्याला तीन वेळा पहिल्याच चेंडूवर खातेही न उघडता माघारी परतावे लागले होते. परंतु विराट आणि रोहित या दोन्ही अनुभवी खेळाडूंना गांगुलीने पाठिंबा दर्शवला आहे. “ते दोघेही गुणवान खेळाडू आहेत. त्यांना लवकरच सूर गवसेल आणि ते मोठ्या धावा करतील याची मला खात्री आहे. आता सर्वच आंतरराष्ट्रीय खेळाडूंना खूप सामने खेळावे लागतात. त्यामुळे त्यांची कामगिरी कधी तरी खालावू शकते. विराट आणि रोहित हे उत्कृष्ट खेळाडू असून त्यांना फार काळ सर्वोत्तम खेळ करण्यापासून रोखणे अवघड आहे,” असेही गांगुलीने नमूद केले.

# फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा : जोकोव्हिचची विजयी सलामी

## संघाबाहेर काढण्याचे कारण मात्र अस्पष्ट



पॅरिस । महाईन्यूज

**जागतिक** क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या सर्बियाच्या नोव्हाक जोकोव्हिचने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत विजयी सलामी दिली. पुरुष एकेरीत त्याच्यासह दुसऱ्या मानांकित डॅनिल मेदवेदेवलाही आगेकूच करण्यात यश आले. महिलांमध्ये कॅरोलिना प्लिस्कोव्हा, अलाइज कॉर्ने आणि डॅनिएले कॉलिन्स यांनी विजयासह दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला.

गतविजेत्या जोकोव्हिचने पहिल्या फेरीच्या लढतीत जपानच्या योशिहितो निशिओकावर ६-३, ६-१, ६-० असा सहज विजय मिळवला. अन्य एकेरीच्या सामन्यात मेदवेदेवने अर्जेंटिनाच्या फाकुंडो बाग्निसला ६-२, ६-२, ६-२ असे पराभूत केले. डेन्मार्कच्या रूनने शापोव्हालोव्हला ६-३, ६-१, ७-६ असे सरळ सेटमध्ये नमवत धक्कादायक निकालाची नोंद केली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही